


श्रीमठाच्या संक्रमण कालांतील महामेरू

# ✿ श्रीकमलानाथतीर्थ स्वामीजी ✿

श्रीकाशीमठाधीश श्रीमद् सुकृतेंद्रतीर्थ यांनी शके १८६१ प्रमाथी संवत्सरांत ५० दिवस
श्रीपर्तगाळ मठांत वास्तव्य केले. त्यावेळीं घेतलेले छायाचित्र



| | | |
|---|---|---|
| श्रीमद् सुकृतेंद्र तीर्थ स्वामी<br>काशीमठ | श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामी<br>गोकर्णमठ | श्रीमद् कमलानाथ तीर्थ स्वामी<br>(शिष्य स्वामी गोकर्ण मट) |

## श्रीमठाच्या संक्रमण कालांतील महामेरू

# श्रीकमलानाथतीर्थ स्वामीजी

५० व्या पुण्यतिथि प्रसंगी प्रकाशन
चैत्र शु॥ ११ शी, शके १९१५

व्यापाराः स्वगुरोरिवेह बहवो विद्यान्नदानादिकाः
ख्याता यस्य महात्मनो विजयिनो व्याप्तास्तथा कीर्तयः ।
लोके यत्स्मरणं विपत्तिहरणं यद्दर्शनं पुण्यदं
श्रीमन्मङ्गलपूज्यपादकमलानाथं गुरुं तं भजे ॥८॥

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी
पर्तगाळ (गोवा)

SHREE KAMALANATHTEERTH SWAMIJI

✺

**संकलन व प्रकाशन :**
चंद्रकांत शांताराम केणी
श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी
पर्तगाळ (काणकोण) गोवा

✺

**प्रकाशन तिथि :**
चैत्र शु|| ११ शी, शके १९१५
३ एप्रिल १९९३

✺

**अक्षर-जुळणी, सजावट, मुद्रण :**
ओमेगा एन्टरप्राएझेस,
श्रेयस्, विद्यानगर कॉलनी,
११५८, विद्यानगर,
मडगांव - गोवा. ४०३ ६०१


✺

(खाजगी वितरणासाठीं)

# श्री कमलानाथतीर्थ श्रीपाद वडेर

जन्म तिथि : श्रीशके १८०७, पार्थिव संवत्सर, कार्तिक शु॥ षष्ठी, शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर १८८५

## जन्मपत्रिका




आश्रमदीक्षा : श्रीशके १८२९, प्लवंग संवत्सर, वैशाख व॥ ५ मी, शनिवार.

पट्टाभिषेक : श्रीशके १८६४, चित्रभानु संवत्सर, वैशाख शु॥ (अक्षय्य) तृतिया, शनिवार.

मुक्ति : श्रीशके १८६५, सुभानु संवत्सर, चैत्र शु॥ ११शी, शुक्रवार. (सायं. ६.१०)

# शिष्यपदावर आल्यापासून गुरुवर्यांसह झालेली श्रीकमलानाथतीर्थांच्या कारकिर्दीतील ठळक कार्ये

| **इसवी सन्** | **महत्वाची कार्ये** |
| --- | --- |
| १९०७ | आश्रम |
| १९०८ | पुष्कर, मथुरा, गोकुल, वृन्दावन, हरिद्वार, हृषीकेश प्रयाग, गया वाराणसी, अयोध्या, वगैरे महातीर्थयात्रा. |
| १९०९ | शेळी नूतन मठांत श्री दामोदर-कृष्णदेवाची प्रतिष्ठा. |
| १९१० | जगन्नाथपुरी - द्वारका यात्रा. फक्त गुरू श्रीइन्दिराकांत स्वामी महाराजाकडून. |
| १९१६ | तिरुपति, विष्णुकांचि, रामेश्वर, मधुरा या तीर्थांची यात्रा. |
| १९२२ | होन्नावर गांवातील श्रीवेंकटरमण देवस्थान श्रीसंस्थानचें हस्तांतरण करून घेतलें. |
| १९२३ | कारवार मठ स्थापना. |
| १९२५ | पर्तगाळ मठीं श्रीरामदेवा समोरील मोठी माडी व खालील चावडीसह संपूर्ण बांधकाम. |
| १९३४ | पर्तगाळ मठीं श्रीवीरविठ्ठलदेवाच्या समोरील वासरी, खालील वासरी आणि नैवेद्याच्या स्वयंपाकगृहाचें नूतनीकरण. |

✿✿

# श्रीकमलानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी

**श्री**संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या इतिहासांतील सुवर्ण काळाचा आरंभ शालिवाहन शकाच्या अठराव्या शतकाच्या आरंभीं श्रीमद् इंदिराकांततीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींच्या पट्टाभिषेकाबरोबरच झाला. समाजाच्या इतिहासांतील तो अत्यंत कसोटीचा कालखंड होता. समाजांत नव्या युगाचे वारे वाहूं लागले होते अणि त्यांतून अनेक संघर्षहि निर्माण होऊं लागले होते. नव्या-जुन्या मान्यतांच्या व संस्कारांच्या मंथनामुळें जी कटुता निर्माण होत होती ती सामाजिक स्वास्थ्याचा व एकतेचा, सारस्वत समाजाच्या नीतिमूल्यांचा आणि विशेष म्हणजे समाजांतली धर्म व धार्मिकता ऱ्हास करूं लागल्याचीं चिन्हें दिसत होतीं.

अशा कसोटीच्या काळीं श्रीमद् इंदिराकांत तीर्थ गुरुपीठावर आले आणि त्यांच्या विद्वत्तेची व तपस्येची प्रभा, कठोर साधनेची दग्धता, धर्मशास्त्राची व्यवहाराशीं सांगड घालण्याच्या चिकित्सक कुशलतेचा प्रभाव समाजावर पडूं लागला. त्यांनी समाजापुढील विविध प्रश्न समर्थपणे हाताळून अनेक नाजुक गुंते हळुवारपणे सोडविले आणि परंपरा अबाधित ठेवून परिवर्तनाचा मार्ग खुला केला. त्यामुळे नैतिक दृष्ट्या उन्नत, सामाजिक दृष्ट्या सुसंघटित व आर्थिक दृष्ट्या समृध्द असा समाज घडूं शकला. श्रीमठाच्या इतिहासांतील सुवर्ण पर्व तेव्हांच सुरू झालें.

परंतु पुनवेच्या तेजस्वी चंद्राला, मध्यान्हीच्या वेळीं आकाशांत पूर्ण तेजाने तळपणाऱ्या दिनकराला ग्रहण लागावें तशा प्रकारची एक उदास सावली श्रीस्वामीजींच्या मनावर त्याच सुमारास पसरली व स्वामीजींच्या खिन्नतेचा परिणाम समाज जीवनावरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं.

श्रीगुरुपीठारोहणानंतर चार वर्षांच्या आंतच स्वामीजींनी व्यास राव आचार्य नांवाच्या चिक्कनकोड येथील सुविद्य अर्चक घराण्यांतील एका कांतिमान बटूचा शिष्य म्हणून स्वीकार करून आपल्या आवडीने श्रीनरहरीतीर्थ असे नांव बहाल केलें होतें. शिष्य व स्वामीजी यांचा सहवास फक्त एका वर्षाचा. पण त्या काळांत शिष्याची बुध्दिमत्ता, नम्रता आणि व्यवहार कौशल्य पाहून गुरूस्वामींच्या मनांत वात्सल्य दुथडी वाहूं लागले. गुरूशिष्याची जोडी दृष्ट लागण्या सारखीच होती. तसेंच कदाचित घडलेलें असावें. अल्प आजाराचें निमित्त झाले आणि श्रीशके १८१९ च्या मार्गशीर्ष महिन्यांत श्रीनरहरितीर्थांनी देहत्याग केला.

तसें गुरूंचे वय त्यावेळीं विशेष नव्हतें. तरी ज्यांच्या कर्तृत्वावर श्रीमठाच्या उज्वल भविष्यकाळाचीं स्वप्ने स्वामीजींनी पाहिली होतीं तीं क्षणार्धांत जमीनदोस्त झालीं. योगशक्तीच्या बळावर श्रीमद् इंदिराकांत तीर्थांनी मनाचा तोल ढळूं दिला नाहीं तरी मायापाश तोडून संन्याशाचें

विरक्त जीवन पत्करलेल्या त्या महात्म्यालाहि अपार आंतरिक वेदना होत राहिल्या. त्या शोकाकूल अवस्थेंतच स्वामीजींनी भोजनत्याग केला.

श्रीमठाचे व्यवहार यथासांग चालत होते आणि कुठेच तसूभर देखील कमतरता राहणार नाहीं याची स्वामीजी दक्षता घेत होते. तरी देखील तेजस्वी चेहऱ्यावरील उदासीनता निकटवर्ती शिष्य परिवाराच्या नजरेत भरल्या शिवाय रहात नव्हती.

श्रीमठाचा व्याप सतत वाढत होता आणि त्याचबरोबर नव्या युगांतील नव्या समस्या घेऊन स्वामीजींकडे येणाऱ्या मठानुयायी वर्गाची संख्याहि वाढत होती. या सर्वांचे समाधान स्वामीजी करीत; पण मठाच्या व्यापांतून मुक्त होऊन तीर्थाटनाची प्रबल इच्छा त्यांच्या मनांत घर करून राहिली होती.

तब्बल दहा वर्षे ही परिस्थिति राहिली. निकटवर्ति शिष्यपरिवाराला वाटायचें कीं नव्या शिष्याचा स्वीकार केला तर पहिल्या शिष्याच्या वियोगाचा दुःखभार हलका होऊन स्वामीजींच्या मनावर पडलेली ग्रहणाची दुःखछाया हळुहळू पुसट होत राहील. परंतु त्या विषयावर स्वामीजींशीं सरळ बोलण्याचें साहस कुणालाच करवत नव्हतें. अशा परिस्थितींत स्वामीजींनी भ्रमणाची आपली योजना शिष्यपरिवारापुढें मांडली असतां तीर्थाटनाला प्रस्थान करण्यापूर्वी शिष्यस्वीकार करावा अशी आग्रही सूचना निकटवर्ति अनुयायांनी केली.

अनुयायांच्या प्रस्तावाला श्रीमद् इंदिराकांततीर्थांनी मूक संमति दिली आणि सुयोग्य बटु शोधण्याचें काम सुरू झालें. तथापि अनुरूप बटु मिळेना.

आसेतुहिमाचल भारतांतील प्रमुख तीर्थांच्या यात्रेचा संकल्प करून बसलेल्या गुरुस्वामींनीं मठानुयायांची एक खास महासभा बोलावून घेतली व यात्रेसाठीं प्रस्थान ठेवण्यापूर्वीच शिष्यस्वीकार करण्याचा आपला विचार प्रकट केला. इतकेच नव्हे तर आपण स्वतः मनांतल्या मनांत बटूची निवड करून ठेवली आहे असें जाहीर करून स्वामीजींनी सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.

ज्यावेळीं स्वामीजींनी खुद्द पर्तगाळी मठांतील आचार्य वैकुंठ नारायण आचार्य यांचे पुत्र बटु होण्यास सर्वथा योग्य असल्याचा आपला विचार महासभेपुढें मांडला, तेव्हां सर्वांना साश्चर्य आनंद झाला. अनुरुप बटु जवळ असूनहि इतरांच्या नजरेंत तो भरला नव्हता. स्वामीजींनी मात्र त्याच्या व्यक्तित्वांतील तेजस्विता, वेधक दृष्टि, सर्वांशीं मिळून मिसळून वागण्याचा स्वभाव, विद्यार्जनांत व व्यावहारिक गोष्टींतील कौशल्य पाहून ठेवलें होतें.

लगेच जन्मपत्रिका मागवून घेण्यांत आली. ग्रहयोग अनुकूल होते. क्षणाचाहि विलंब न लावतां स्वामीजींनी श्रीरामदेवाचा कौल घेतला. तोहि तत्काळ मिळाला आणि त्याच महासभेने बटूच्या कुटुंबियांच्या संमतीनें त्याला रीतसर पाचारण करून शिष्य म्हणून त्याची निवड झाल्याची घोषणा केली.

संन्यास दीक्षेसाठीं शके १८२९ मधील वैशाख कृष्ण पंचमीचा दिवस निश्चित करण्यांत आला आणि संन्यासदीक्षेच्या वेळी नव्या बटूला श्रीकमलानाथतीर्थ असें नामाभिधान देण्यांत आलें.

दीक्षोत्तर अभ्यासक्रमांत श्रीकमलानाथतीर्थांनी विलक्षण प्रविण्य दाखविलें आणि तीर्थाटनाचा ध्यास घेऊन बसलेल्या गुरुवर्यांनी लगेच मठाचा कारभार श्रीकमलानाथतीर्थांच्या हातीं सुपूर्द केला.

तदनंतर चैत्र कृष्ण सप्तमी शके १८६४ पर्यंत तब्बल पस्तीस वर्षे श्रीकमलानाथतीर्थांनी गुरूंच्या नांवाने श्रीमठाचा कारभार समर्थपणे चालविला. १८६४ शकीं अक्षय्यतृतीयेच्या सुमुहूर्तावर ते गुरूपीठावर आले आणि चैत्र शुक्ल एकादशी १८६५ ह्या दिवशीं त्यांचें महानिर्वाण झालें.

श्रीकमलानाथतीर्थ श्रीपाद वडेर हे श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेंतील एकविसावे स्वामी होत. शिष्य व स्वामीजींचा तब्बल पस्तीस वर्षांचा निकट संबंध राहिला. या प्रदीर्घ कालावधींत श्रीकमलानाथतीर्थांनी गुरूंच्या सावलीची भूमिका घेतली. श्रीमद् इंदिराकांततीर्थांचें महानिर्वाण १८६४ च्या चैत्र महिन्यांत झालें आणि त्याच वर्षी अक्षय्यतृतियेच्या सुमुहूर्तावर श्रीकमलानाथतीर्थांचा पट्टाभिषेक झाला. श्रीगुरूपीठावर एका वर्षाचा कार्यकाल पूर्ण होण्याआधींच चैत्र शुध्द ११शी च्या दिवशीं त्यांचें महानिर्वाण झाल्यामुळें गुरूपीठावरील त्यांची कारकीर्द आषाढांतील मेघाच्छादित आकाशांत अल्पकाळ दर्शन देणाऱ्या सूर्यासारखी राहिली.

केवळ अकरा महिने व सात दिवस ते गुरूपीठावर राहिले खरे, परंतु त्या अल्पकाळांत देखील त्यांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा ठसा श्रीमठाच्या कार्यावर ठळकपणे उमटला. जीवनाचा अर्ध्याहून अधिक काळ मध्यान्ही तळपणाऱ्या सूर्याप्रमाणे तेजस्वी अशा गुरूवर्य श्रीमद् इंदिराकांततीर्थ स्वामीजींच्या व्यक्तिमत्वाच्या, सहसा नजरेंत न भरणाऱ्या, सावलीचें जीवन ते जगले आणि पट्टाभिषेका नंतरचा काळ बदलत्या युगाला अनुरूप असे नेतृत्व श्रीमठाला देण्याच्या ईर्षेने आपले शिष्य श्रीद्वारकानाथतीर्थ यांना प्रशिक्षित करण्यांत गेला.

जे जे मठानुयायी व इतर भाविक श्रीकमलानाथतीर्थांच्या संपर्कांत आले, त्यांच्या प्रासादिक वाणीचें श्रवण करण्याची ज्यांना संधि मिळाली अथवा जवळून किंवा दुरून त्यांच्या नीरक्षीर न्यायबुध्दीचें ज्यांना दर्शन घडूं शकलें त्यांचा माथा या दिग्गजांसमोर आपोआप नमला. श्रीमठाच्या इतिहासांत गुरूच्या व्यक्तिमत्वांत आत्मविलोपन करून बसलेले दुसरेहि महर्षी होऊन गेले. परंतु ज्यावेळीं त्यांचा पट्टाभिषेक झाला, त्यावेळीं आपली वैयक्तिक विद्वत्ता व पुण्यसंचयाचें दर्शन ते भक्तगणांना घडवूं शकले. ती संधि श्रीकमलानाथतीर्थांच्या वांट्याला आली नाहीं तथापि व्यावहारिक कारणासाठीं व स्वेच्छेने गुरुवर्यांच्या सावलीची भूमिका घेण्यांत धन्यता मानणारे श्रीकमलनाथतीर्थ यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हा वाऱ्याच्या हळुवार झुळकेसारखा दोळयांना न दिसणारा पण मनाला जाणवणारा असा होऊन राहिला आहे.

श्रीकमलानाथतीर्थ यांनी संन्यासदीक्षा घेतली त्यावेळीं मठकक्षेंतील कार्याचा त्याना विशेष अनुभव नव्हता तरी देखील मठाच्या पाठशाळेंत स्वामीजींच्या देखरेखीखालीं विद्यार्जन केलेल्या विलक्षण बुध्दिमत्तेच्या शिष्याच्या योग्यतेवर गुरुस्वामींचा इतका विश्वास होता कीं स्वामीजींनी श्रीमठाचे व्यवहार त्यांच्या हातीं सुपूर्द करून आपल्या मनांतील तीर्थयात्रेची योजना कार्यवाहींत आणली. तसा लोकव्यवहाराचा श्रीकमलानाथतीर्थांना थोडाफार अनुभव होता. म्हणूनच गुरूंनी सोंपविलेली कामगिरी चोखपणे पार पाडून गुरुवर्यांचा विश्वास अनाठायीं नव्हता हें त्यांनी सिध्द करून दाखविलें.

सर्वप्रथम श्रीकमलानाथतीर्थांनी दहा वर्षांच्या उदासीनतेच्या काळांत श्रीमठाच्या आर्थिक व्यवहारांत आलेलें शैथिल्य दूर केलें आणि आर्थिक पाया खंबीर केला. श्रीमद् इंदिराकांततीर्थांच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत सुमारे १५० ठिकाणांची मठाच्या स्थावर मालमत्तेंत भर पडली. त्यांतील फकत २५ ठिकाणची मालमत्ता शिष्यस्वीकारापूर्वी मठाच्या अधिकक्षेंत आली होती. शेष १२५ ठिकाणची मालमत्ता मठाच्या कक्षेंत आणून तिचा चोख सांभाळ करण्याचें श्रेय त्यांचे शिष्य श्रीकमलानाथतीर्थ यांनाच द्यावें लागेल.

गुरूंवर श्रीकमलानाथतीर्थांची असीम भक्ति. त्यांच्या तोंडून अनवधानाने निघालेला शब्द देखील ते आज्ञावत मानीत आणि तसें करणें शारीरिक दृष्ट्या क्लेशाचें व अन्यथा जोखमीचें आहे हें स्वतःच्या बुध्दीला पटलें तरी गुरूंच्या शब्दाचें ते निष्ठेने पालन करीत.गुरूंचा सहवास ही ज्ञानग्रहण करण्याची आणि त्यांची सेवा ही पुण्यसंचय करण्याची संधि असें ते मानीत. प्रत्येक गोष्ट, मग ती कितीहि लहान असो, गुरूंच्या अनुज्ञेनेच ते करीत. मठाचा व्यवहार वाढत राहिल्यामुळें अनेकदां गुरु संचारांत असतांना त्यांना मठांत रहावें लागे आणि अनेक तात्कालिक प्रश्न हाताळावे लागत. अशा कसोटीच्या वेळीं गुरूंचे स्मरण करून ते निर्णय घेत. शिष्याची कार्यपध्दती इतकी नेटकी व तत्त्व-व्यवहाराशीं सुसंगत असायची कीं मठाच्या कक्षेंतील व्यवहाराची चिंता न करतां गुरू निश्चिंत मनाने देशाटन करूं शकत होते.

श्रीकमलानाथतीर्थांच्या कारकिर्दींत समाजांतील लहानमोठे तंटे व कलह सोडविण्याची कामगिरी त्यांना बजावावी लागली. बहुधा शिष्यपरिवार आपल्या कैफियती घेऊन मठांत यायचा. परंतु समाजांत कुठेंहि कलह माजल्याची वार्ता येतांच तो मिटविण्यासाठीं शिष्यस्वामी आपणहून पुढाकार घेत. मठाचे व्यवहार चोखपणे सांभाळतानाच समाजांतील अडल्या नडल्यांच्या अडीअडचणीकडे ते लक्ष ठेवीत. स्वभावाने कनवाळु असल्याने अडल्या कुटुंबांना ते बिनबोभाट आर्थिक व इतर प्रकारचें साह्य पोंचवीत. समाजांत सलोखा व बंधुभाव वृध्दिंगत करण्यासाठीं आपल्या सोयी-गैरसोयीकडे, आहार किंवा निद्रेकडे दुर्लक्ष करून ते अविरत प्रयत्नशील राहात. अशा गोष्टींमध्यें गुरूवर्य लक्ष घालीत नसले तरी आपल्या शिष्याने हातीं घेतलेल्या सत्कार्याबद्दल ते समाधानी होते. आणि शिष्य देखील गुरुवर्यांच्या मनाचा कल समजूनच पावलें उचलीत.

गुरू श्रीइंदिराकांततीर्थ व शिष्य श्रीकमलानाथतीर्थ यांची जोडी पाहण्याची अलौकिक संधी शिष्यपरिवाराला अनेक वर्षे लाभली व अनेकांनी त्यांची तुलना राम-लक्ष्मणाच्या जोडीशीं केली. श्रीमठाच्या इतिहासांत दीर्घकाळपर्यंत एकामेकांमध्यें ओतप्रोत होऊन चमकलेली गुरूशिष्याची दुसरी जोडी नसेल. श्रीकमलानाथतीर्थांनी गुरूवर्यांच्या उपस्थितींत नेहमी दुय्यम भूमिका घेतली तरी अनेक महत्वाचे निर्णय घेण्यापूर्वी गुरूवर्य कटाक्षाने शिष्याशीं सल्लामसलत करीत. गुरूशिष्यांच्या संयुक्त कारकीर्दींत श्रीमठाचा सुवर्णकाळ निष्कलंक झाला व त्याचें तेज अधिकच उज्वल झालें.

गुरूवर्य पीठावर असतांना झालेल्या कामाची गणना गुरूंच्या खातीं जमा होणे स्वाभाविक असलें तरी कारवार येथें श्रीमुरलीधर मठाची संस्थापना, गोकर्ण व वेंकटापुर येथील पुरातन मठांचा जीर्णोध्दार आणि पर्तगाळी मठाची सुधारणा आणि विस्तार, पाहुण्यांसाठीं बंगल्याचें बांधकाम आणि रामनवमीच्या रथाची डागडुजी इत्यादि महत्त्वाच्या कार्यांचे श्रेय निःशंक मनाने श्रीकमलानाथतीर्थांनाच देतां येईल.

आपल्या पूर्वाश्रमांतील जमिनीचें उत्पन्न श्रीकमलानाथतीर्थांनी मठाला लावून दिलें व त्या उत्पन्नांतून चैत्र शुध्द चतुर्थीचा उत्सव साजरा व्हावा अशी व्यवस्था केली. तेव्हांपासून पर्तगाळी मठांतील श्रीरामनवमी उत्तसव, जो तोंवर पंचमीला सुरू व्हायचा, चर्तुर्थीच्या दिवशीं सुरू होऊं लागला.

श्रीकमलानाथतीर्थांच्या चरित्रांतील दोन महत्वपूर्ण घटनांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. पहिली घटना म्हणजे त्यांना जडलेल्या असाध्य आजाराची होय.

औषधोपचाराने गुण पडत नव्हता. गुरुवर्य श्रीइंदिराकांततीर्थांनी देवाचे तीर्थ आजारी शिष्याला द्यायला सांगितले व त्या क्षणापासून श्रीकमलानाथतीर्थांना गुण पडत गेला.

दुसरी घटना म्हणजे शिष्याची निवड होय. श्रीकमलानाथतीर्थांप्रमाणेच श्रीद्वारकानाथतीर्थ हे मठांतील पाठशाळेचे एक विद्यार्थी होते. इतिहास कुशी बदलूं लागला आहे याची चाहूल गुरूशिष्यांना लागली होती. त्यांनी आपसांत विचारविनिमय करून गोविंद या बटूची योजना केली होती. श्रीकमलानाथतीर्थांनी गुरूपीठावर आल्यानंतर त्यांना दीक्षा दिली व इतिहासांतील एका कसोटीच्या पण तितक्याच दैदीप्यमान काळखंडावर पडदा टाकून मठाबरोबरच समाजालाहि नव्या युगाच्या उषःकालाचें दर्शन घडवलें.

✿✿

# अथ श्रीमत्कमलानाथतीर्थश्रीपादाष्टकम्

**श्रीमत्पारमहंस्यपालनपटोस्तेजस्विनः श्रीन्दिरा-**
**कान्ताख्यस्थ गुरोर्लसत्करवरक्षीरार्णवादुत्थितम् ।**
**श्रीगोकर्णमठाधिनाथकमलानाथाख्यदेवद्रुमं**
**सद्विद्यादिसमस्तवाञ्छितफलप्राप्त्यै नितान्तं भजे ॥१॥**

आश्रमधर्मांत उच्च अशा संन्यासधर्माचें पालन करण्यास जे अत्यंत दक्ष असून तेजस्वी असतात, त्या श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपाद नामक गुरूंच्या शोभायमान अशा हस्तरूपी क्षीरसमुद्रापासून उत्पन्न झालेल्या श्रीगोकर्णमठाधीश श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपाद नांवाच्या कल्पवृक्षास उत्तम विद्यादि समस्त इच्छितफलांच्या प्राप्तीकरितां मी भक्तिभावें भजतों.

**संतुष्टं गुरुमानसं गुणनिधौ यस्मिन्स्वशिष्ये स्थिता-**
**न्धैर्यस्थैर्यशमक्षमादमदयादाक्षिण्यपूर्वान्गुणान् ।**
**भक्त्यौदार्यशुचित्वतेजऋृताचातुर्यपूर्वैर्युता-**
**न्वैराग्यं परमं च वीक्ष्य कमलानाथं गुरुं तं भजे ॥२॥**

सद्गुणांचा सांठाच असणाऱ्या आपल्या शिष्यांचे ठिकाणीं असलेलें धैर्य, स्थिरता, भगवन्निष्ठा, क्षमा, इंद्रियनिग्रह, भूतदया, दाक्षिण्य, श्रीहरिगुरुभक्ति, उदारता, शुचिर्भूतपणा, तेज, सरळपणा, चातुर्य वगैरे सद्गुण व विशेष तऱ्हेचें वैराग्य हीं पाहून गुरुजींचें मन संतुष्ट झालें आहे, अशा त्या श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादस्वामी यांना मी भजतों.

**श्रीमन्मध्वमहामुनिप्रकटिते भाष्यादिशास्त्रोदधौ**
**निष्णांत सकलागमज्ञगुरुणा प्रेम्णा समध्यापिते ।**
**श्रीमद्व्यासकृते पुराणसहिते श्रीमन्महाभारते**
**तर्कव्याकरणादिके च कमलानाथं गुरुं तं भजे ॥३॥**

आपले सकलशास्त्रज्ञ गुरु श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादस्वामी यांनी प्रीतीनें शिकविलेल्या, श्रीमन्मध्वाचार्यांनीं प्रकाशित केलेल्या ब्रह्मसूत्रभाष्यादिशास्त्ररूपी महासागरांत आणि श्रीमद व्यासमुनींनी रचिलेलीं अठरा पुराणें व महाभारत यांत तसेंच तर्क-व्याकरण-धर्मशास्त्र वगैरे विद्येंत

निष्णात अशा त्या श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादस्वामीना मी भजतों.

**अङ्घ्र्योः स्वस्य वसन्ति सन्ति सततं तीर्थान्यथो देवताः**
**क्षेत्रस्थाःसुपवित्रगात्रसदने स्वस्य स्थिताः सन्त्यपि ।**
**तन्मानार्थमथो नृशिक्षणकृते यात्राभिसंपादिता**
**येन श्रीगुरुसंयुतेन कमलानाथं गुरुं तं भजे ॥४॥**

पुष्कर-गंगादि श्रेष्ठ तीर्थें आपल्या चरणांच्या ठिकाणीं सर्वदा वास करीत असतां आणि क्षेत्रस्थानांत वास करीत असणाऱ्या सकल देवताही अतिपवित्र अशा आपल्या देहरूपी घरांतच राहत असतांही, त्या त्या तीर्थदेवतांच्या गौरवाकरितां आणि लोकसंग्रहाकरितां ज्यांनीं आपल्या गुरुवर्यासमवेत तीर्थक्षेत्रयात्रा शास्त्रोक्तविधीनें संपादिल्या, त्या श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादस्वामीना मी भजतों.

**यासु ब्राह्मणभोजनं सुबहुलं योग्यास्तथा दक्षिणा**
**नानाजातिजनास्तथैव सुभृशं तृप्ता भवन्त्यन्वहम् ।**
**ताः श्रीरामरथोत्सवप्रभृतयः संवर्धिताः सत्क्रिया**
**येन श्रीगुरुसंयुतेन कमलानाथं गुरुं तं भजे ॥५॥**

ज्यांचे ठिकाणीं नानातऱ्हेच्या पक्वान्नांनीं युक्त असें भोजन ब्राह्मणांना यथेच्छ मिळतें व दक्षिणाही यथायोग्य दिली जाते तसेंच इतर नाना जातीचे लोकही दररोज शिधासामग्रीनें अत्यंत तृप्त होतात, ते श्रीरामनवमी वगैरे दिवशीं होणारे रथोत्सवादिकांसारखे अनेक उत्कृष्ट समारंभ ज्यांनीं आपल्या गुरूंच्या अनुमतीनेंच अभिवृद्धीला पोंचविले, त्या श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादस्वामी यांना मी भजतों.

**कावरि नगरे सुशिक्षितनरे नानाकलाद्याकरे**
**स्वस्य श्रीगुरणैव नूतनतया निर्मापिते श्रीमठे ।**
**देवः श्रीमुरलीधरः सगुरुणा येन प्रतिष्ठापितः**
**श्रीमद्व्याधिभयंकराङ्घ्रिकमलानाथं गुरुं तं भजे ॥६॥**

अनेक तऱ्हेच्या विद्या व कला ह्यांची खाणच असून सुशिक्षित लोकांनीं गजबजलेल्या अशा कारवार शहरांत आपल्या श्रीगुरूंनीं नवीनच बांधविलेल्या श्रीमठांत श्रीमुरलीधर देवाची प्रतिष्ठा

ज्यांनीं स्वगुरुसमवेत केली, त्या समयींच्या प्रतिवादि लोकांना भयंकर असे चरण ज्यांचें त्या श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादस्वामीना मी भजतों.

**जीर्णः श्रीयुतवेंकटापुरगतो देवालयश्चोद्धृतः**
**श्रीमत्पर्वतकाननस्थितमठप्राकारकश्चोद्धृतः ।**
**श्रीगोकर्णपुरस्थदेवनिलयप्राकारकश्चोदद्धृतो**
**येन श्रीगुरुसंयुतेन कमलानाथं गुरुं तं भजे ॥७॥**

भटकळ बंदराच्या जवळ असणाऱ्या श्रीवेंकटापुर येथील श्रीवेंकटेश देवस्थान, श्रीपर्तगाळीमठाच्या अग्रशाळा आणि श्रीकर्णातील मठाच्या अग्रशाळा ह्यांचा जीर्णोद्धार ज्यांनीं स्वगुरुसमवेत केला, त्या श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादस्वामी यांना मी भजतों.

**व्यापाराः स्वगुरोरिवेह बहवो विद्यान्नदानादिकाः**
**ख्याता यस्य महात्मनो विजयिनो व्याप्तास्तथा कीर्तयः ।**
**लोके यत्स्मरणं विपत्तिहरणं यद्दर्शनं पुण्यदं**
**श्रीमन्मङ्गलपूज्यपादकमलानाथं गुरुं तं भजे ॥८॥**

ह्या लोकीं ज्या विजयी महात्म्यांची विद्यादान-अन्नदान वगैरे अनेक तऱ्हेचीं सत्कृत्यें आपल्या गुरूंच्याप्रमाणें पुष्कळच चालू असलेलीं प्रसिद्ध आहेत, त्याचप्रमाणें ज्यांची कीर्ति सर्वत्र पसरलेली आहे व ज्यांच्या स्मरणाने संकटें नष्ट होतात आणि ज्यांचें दर्शन पुण्यकारक आहे, त्या म्हणजे मंगल व पूज्य चरण ज्यांचे त्या श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादस्वामी यांना मी भजतों.

**इदं श्रीकमलानाथश्रीपादाष्टकमिष्टदम् ।**
**तच्छिष्यकुमठानारायणाचार्येण निर्मितम् ॥९॥**

इच्छित फल देणारें श्रीमत्कमलानाथतीर्थ श्रीपादवडेर स्वामी यांचें श्लोकाष्टक हें, त्यांचे शिष्य कुमठा नारायणाचार्य ह्यांनी रचिलें.

✿✿

श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे बाविसावे पीठाधीश
श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी




शिष्यस्वीकार : वैशाख वद्य सप्तमी शके १८६४ गुरुवार  पट्टाभिषेक : चैत्र वद्य अष्टमी शके १८३५ मंगळवार

समाधि : फाल्गुन वद्य षष्ठी शके १८९४ रविवार

विष्णु : सर्वोत्तम : सेव्यो । वायुर्जीवोत्तमोऽपिव :॥



# श्रीसंस्थान गोकर्ण - पर्तगाळी - जीवोत्तम मठ



श्रीकमलानाथतीर्थांचे पर्तगाळी येथील वृंदावन